# मॉडर्न हायस्कूलमध्ये 'पोलिस संवाद'

**पुणे** : पंख संस्था व क्रिकहिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या जीवनमूल्य शिक्षण प्रकल्पांतर्गत नववीतील विद्यार्थ्यांसाठी स्व: ओळख, ताणतणाव नियोजन, व्यसनमुक्ती, लैंगिक शिक्षण अशा वेगवेगळ्या विषयांवरची सत्रें घेतली जातात. शिवाजीनगरमधील मुलांच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये नुकताच हा प्रकल्प राबविण्यात आला. जीवनमूल्य प्रकल्पाचाच एक भाग म्हणून पोलिस संवाद कार्यक्रम झाला.

कार्यक्रमादरम्यान मुलांनी पोलिसांना वेगवेगळे प्रश्न विचारले. पोलिसांकडून छेडछाड, पॉक्सो कायदा, सायबर गुन्हे यावर मार्गदर्शन झाले. या कार्यक्रमासाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक बापू शिंदे व फौजदार दिपक जाधव उपस्थित होते. यावेळी पंख संस्था अध्यक्ष स्मिता आपटे, ट्रस्टी कल्याणी भाबड, मॉडर्न हायस्कूलच्या मुख्याध्यापिका संगीता लकारे, उपमुख्यध्यापिका रोहिणी काळे, पर्यवेक्षिका सीमा कुळधारण व पंखचे सदस्य तसेच शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन पंख क्षितिजा शिर्के यांनी केले व आभार मॉडर्न हायस्कूलचे शिक्षक निवृत्ति गोपाळे यांनी मानले.

मंगळवार दि. १६ जुलै २०१९

।।श्री।।

(४-०)